● सोमवार, दि. १४ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ८३ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जीवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

साडेतीनशे कोटींच्या 'परतूर- मानवत रोड' रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

## परतूर विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगिण विकासासाठी हजारों कोटींचा निधी खेचून आणला - आ. लोणीकर



**परतूर । प्रतिनिधी -** सर्वांगीण विकासाच्या बाबतीत मी विधानसभेत प्रतिनिधित्व करीत असलेला परतूर विधानसभा मतदारसंघ महाराष्ट्र राज्यातील विकसित मतदार संघाच्या तुलनेत एक नंबरला विकसित असल्याचा दावा महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केला. आशियाई विकास बँक अर्थसाहाय्याने प्रकल्पांतर्गत टप्पा - ३ व केंद्र शासन अर्थसाहाय्यअंतर्गत ३५५ कोटी रुपये किंमत असलेल्या परतूर - वरफळ - चिंचोली - सातोना - सेलू - मानवत रोड रस्त्याच्या सुधारनेसह सिमेंट काँक्रेटीकरण करणे कामाचा भूमिपूजन समारंभ सोहळा साईबाबा मंदिरा जवळ परतूर शहरात संपन्न झाला. या वेळी ते बोलत होते. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात देशाची वाटचाल विकसित राष्ट्राकडे होत असताना केंद्रीय दळणवळण मंत्री माननीय नितीनजी गडकरी यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या माध्यमातून उत्कृष्ट मजबूत टिकाऊ रस्त्याचं जाळ निर्माण झाल आहे. महाराष्ट्रात राज्य सरकारने शेकडो कल्याणकारी योजना राबविल्याने त्या सर्वच्या सर्व योजना जशाच्या तशा परतुर विधानसभा मतदारसंघात राबविण्याकरिता स्वतः अनेकदा जिल्हाधिकारी कार्यालयात व तहसील कार्यालयात आढावा बैठका घेतल्या आहे. यात परतुर विधानसभा मतदारसंघात मागील वर्षभरात प्रधानमंत्री आवास, मोदी आवास, रमाई आवास, शबरी आवास, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजना अंतर्गत १४५३० घरकुलांना मंजुरी मिळाली असून १४५३० घरकुलांसाठी १७४.३६ कोटी रुपयांचा मंजूर निधी पैकी ६५४५ घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यात आचारसंहिते पूर्वी प्रत्येकी १५ हजारांचा हप्ता पडणार असल्याची माहिती या वेळी आमदार लोणीकर यांनी दिली. या भूमिपूजन समारंभ सोहळ्या प्रसंगी शत्रुघ्न कणसे, रमेश भापकर, संपतराव टकले, आतिष राठोड, अशोकराव बरकूले, निवृत्ती आप्पा लाटे, अंकुशराव नवल, भगवानराव मोरे, संभाजी वारे, विकास पालवे, रवी सोळंके, शिवाजी पाईकराव, प्रवीण सतोंनकर, प्रकाश चव्हाण, कृष्णा अरगडे, रंगनाथ रेंगे, बंडू मानवतकर, बाजीराव कातारे, सुंदर मलीक, ओमप्रकाश साठे, ओम सेठ मोर, दत्ता धुमाळ, बापूराव धुमाळ, रमेशराव चव्हाळ, पदमाकर कवडे, बाळासाहेब पवार, शेख नदीम, वसंतराव राजबिंडे, जीवन रेंगले, अविनाश पवार, राजेश जाधव, राम पवार परतूर तहसीलदार श्रीमती प्रतीभा गोरे, परतूर गट विकास अधिकारी तांगडे गुत्तेदार घोडके यांच्या सह हजारो नागरिक उपस्थित होते.

## महायुतीत घनसावंगी मतदार संघावर भाजपाचाच दावा - सुनील आर्दड

**कुंभार पिंपळगाव । प्रतिनिधी -** घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगाव येथे आयोजित पदाधिकारी, कार्यकर्ता बैठकीत बोलतांना भाजपा नेते माजी नगराध्यक्ष सुनील आर्दड यांनी सांगितले की, घनसावंगी मतदारसंघांमध्ये प्रत्येक बुध वर भारतीय जनता पार्टीचे मजबूत संघटन असून भारतीय जनता पार्टीच्या ज्येष्ठ मंडळींनी तसेच आपण स्वतः पक्ष विस्तारासाठी गेल्या सतरा-अठरा वर्षापासून घनसावंगीत काम केले आहे. त्यामुळे घनसावंगी मतदारसंघावर महायुतीमध्ये भारतीय जनता पार्टीचा प्रबळ दावा आहे व पक्षश्रेष्ठींकडे मतदारसंघ भाजपला सोडून घेण्यासाठी आपण शिष्टमंडळासह भेट घेऊन मागणी करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट सांगितले. मतदारसंघांमध्ये २५० शाखांची उभारणी आपण केलेली आहे. तसेच भारतीय जनता पार्टीने दिलेल्या प्रत्येक कार्यक्रम मोदी ९, मतदारसंघातील २३ हजार लोकांना सरल ॲपवर आणण्याचे काम बुध पातळीवरच्या कार्यकर्त्यांनी मजबुतीने केलेले आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टी कडून आपल्याला उमेदवारी मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी ज्येष्ठ नेते मुरलीधर पाटील चौधरी, प्रल्हाद नाना अर्दड ,शंकर मामा लहामगे, प्रदेश महामंत्री सर्जेराव दादा जाधव, अंकुशराव बोबडे, कैलास दादा शेळके, अभयसिंह गुजर, रघुनाथ ताठे यांच्यासह काही कार्यकर्त्यांनी भावना व्यक्त केल्या व

### आर्दड यांनाच उमेदवारी द्या, पदाधिकाऱ्यांची पक्षश्रेष्ठींकडे मागणी

भारतीय जनता पार्टीला ही जागा सोडून घेऊन स्थानिक उमेदवार सुनील आर्दड यांनाच उमेदवारी द्यावी असा आग्रह पक्षश्रेष्ठींकडे करणार असल्याचे सर्वांनी सांगितले. जिल्ह्याबाहेरील व्यक्तीला उमेदवारीसाठी कडाडून विरोध सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दर्शविला.





सदरील बैठकीस मुरलीधर पाटील चौधरी, प्रल्हाद नाना आर्दड, सर्जेराव दादा जाधव, शंकर मामा लहामगे, अंकुशराव बोबडे, कैलास दादा शेळके, फारुख दफेदार, माजिदभाई पठाण, रघुनाथ ताठे, अभयसिंह गुजर, परदेसी, एकनाथ महाराज राठोड, सुरेश राव उगले यांची प्रमुख उपस्थिती होती व पूर्ण मतदार संघातून प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते शेकडोच्या संख्येने उपस्थित होते.

## टेंभूर्णीचा आठवडी बाजार पूर्वीच्या ठिकाणी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील बाजार पट्टी पूर्वीपासून बाजार भरवल्या जात होता. गट्टू बसविण्याची कामा मुळे जागा बदलण्यात आली होती. आता पुन्हा पुर्वीच्याच ठिकाणी बाजार भरणार असल्याने व्यापारी वर्गा कडून निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

टेंभुर्णी येथील आठवडी बाजार हा गेल्या कित्येक वर्षापासून पहिल्या नियोजित जागेत भरत आलेला आहे. येथील सावता मंगल कार्यालया जवळ ही जागा असून येथील जागा ही व्यापारी वर्गाच्या सोईची आणि हिताची आहे. येथील दुकानची जागा सगळ्या ग्राहक यांना माहिती असल्याने त्यांचे व्यापार हे चांगले होतात. या परिसरात आमदार संतोष दानवे यांच्या विकास निधीतून गट्टू बसविण्याचे काम सुरू झाले होते. त्या मुळे येथील बाजार हा दत्त नगर येथील दत्त मंदिर च्या मोठ्या अंगणात भरविल्या जात होता. गेल्या सहा सोमवारपासून तिकडे बाजार भरणे सुरू असल्यामुळे येथील व्यापारी वर्गाची मोठी नाराजी आणि त्यांच्या व्यवसाय वर परिणाम होत असल्यामुळे येणारे बाजार इकडे बरण्याची गरज झाली होती. हीच गरज लक्षात घेऊन येथील ग्राम पंचायतचे सरपंच गौतम मस्के आणि या ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य यांनी निर्णय घेऊन येणारे आठवडी बाजार पहिल्या आणि नियोजित जागेवर भरवल्या जाईल याची हमी दिली.

या निर्णयाचे येथील बाजारातील सर्व लहान मोठ्या व्यापारी वर्गाने स्वागत केले असून त्यांचे त्यांनी आभार मानले आहे. येथून पुढील सर्व बाजार आता पुर्वीच्या ठिकाणी भरणार आहेत. सणासुदीचे दिवस असल्याने याचा फायदा व्यवसायिकांना होणार आहे. व्यापाऱ्यांनीही निर्णयाचे स्वागत केले.



## मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेमुळे दिलासा ; २५०० हून अधिक महिलांचा शिवसेनेत प्रवेश

**मुंबई । प्रतिनिधी -** शिवसेनेला मोठा दिलासा, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिन योजनेतून प्रेरित होऊन गेल्या तीन दिवसांत २५०० हून अधिक महिलांनी शिवसेनेत प्रवेश केला* विधानसभा निवडणुकीच्या अगोदर मोठ्या उत्साहात, गेल्या तीन दिवसांत महाराष्ट्रात २,५०० हून अधिक महिलांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. हा विकास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लाडकी बहिण योजनेच्या दूरदृष्टीमुळे झाला आहे, ज्यात महिलांचे सक्षमीकरण आणि उन्नती यावर भर आहे. ठाणे, पालघर, उत्तर महाराष्ट्र, मुंबईसह महाराष्ट्रातील विविध भागातील महिलांनी मोठ्या प्रमाणात शिवसेनेत प्रवेश केला आहे. उत्तर महाराष्ट्रात ९५० हून अधिक महिलांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे, तर मुंबईत ६५० हून अधिक महिलांनी पाठिंबा देऊन पक्षात प्रवेश केला आहे. लाडकी बहिन योजनेने संपूर्ण महाराष्ट्रातील महिलांच्या भवितव्याला एक नवी दिशा दिली आहे आणि संपूर्ण महाराष्ट्रातील महिलांमध्ये पक्षाचा पाठिंबा आणखी मजबूत केला आहे.

युवा आदर्श

### अन्न परिषद...

**थालीपीठ मसाले भात**
**शेंगाची चटणी लोणी**
**पुरण पोळी कुरवडी**
**तोंडाला सुटले पाणी**
**भिशी ब्याळी अन्ना**
**मसाला डोसा इडली**
**केळीच्या पानावरती**
**पायसम हुग्गी वाढली**
**खाकरा खमण ढोकळा**
**इमारती अन् मालपुरी**
**घी चुरमा दालबाटी**
**दिल्ली चाट पाणीपुरी**
**पनीर पराठा लस्सी**
**गोड पुलाव कश्मीरी**
**बिर्याणी कबाब भारी**
**रसगुल्ले फिशकरी**
**पदार्थ साऱ्या देशातले**
**न्याहरीला सज्ज झाले**
**भूकेला धर्म जात नाही**
**सुखात पोटात बसले**
**पदार्थ सारे छान पचले**
**एक सारखे रक्त झाले**
**मग तेच रक्त उसळले**
**प्रांतभेद ते उफाळले**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## मनाला ज्यांनी मित्र केले तेच महामानव ठरले !



**जालना । प्रतिनिधी -** येथील जुना जालना भागातील तक्षशीला बुद्ध विहारात धम्म चक्र प्रवर्तन दिनानिमित्त पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण संदिप खरात व प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी श्री बुध्दाच्या चरणावरती विजया दशमी दिनी गीत संबोधी संदिप इंगोले हिने सादर केले तसेच सुशांत किशोर साळवे या दुसऱ्या वर्गातील विद्यार्थ्याने इंग्रजीमध्ये भाषण सादर केले. कांबळे ताई व साळवे यांनी बाबासाहेबांचे गीत सादर केले. डॉ प्राचार्य राजकुमार म्हस्के यांनी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की, मनाला ज्यांनी मित्र केले तेज महामानव झाले. मनावर विजय प्राप्त करणारे तथागत गौतम बुद्धांनी मुक्तीचा संदेश दिला.येणाऱ्या पिढ्यानपिढ्या तारणारा एकमेव धम्म म्हणजे बौद्ध होय. मनाची श्रीमंती असावी लागते. धम्माचे पाईक धम्माचा विचार जे चालवतात ते या जगाला न्याय देवू शकतात. तदनंतर डॉ. सुशील सुर्यवंशी यांनी विचारात मनपरिवर्तन करण्याची शक्ती आहे. अंधश्रद्धा निर्मुलन आपण करायला पाहिजे असे ते म्हणाले. यावेळी प्रा.संभाजी कांबळे, सुधीर खंडारे, किशोर साळवे, संतोष तायडे, विशाल वाघमारे, छाया साळवे, शालिनी इंगोले, नलिनी खंडारे, चंद्रकांत वाघमारे, मीना शरणागत, कुलदीप गरड, डॉ. पगारे, प्रा गायकवाड मॅडम, डॉ पडगम मॅडम, सुप्रिया बगडे, ॲड. मगरे मॅडम, अशोक दांडगे, आर.डी. झिने, कोंडिरांम पवार, आत्माराम सुखदाने, रमेश जाधव, बी. के. बोर्डे सर्व उपासक व उपसिका उपस्थित होते.

जलकुंभात मृतदेह आढळल्याने खळबळ

## नागरिकांची आरोग्य तपासणी होणार - आयुक्त खांडेकर

**जालना । प्रतिनिधी -** येथील नुतन वसाहत परिसरात असलेल्या शहर महानगर पालिकेच्या जलकुंभात एका व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. मृतदेह जलकुंभात असतांना जलकुंभातून नूतन वसाहत भागात पाणी पुरवठा करण्यात आला होता. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. याबाबत शहर मनपा आयुक्त यांनी नागरिकांनी या पाण्याचा वापर करु नये असे आवाहन केले असून ज्या भागात हा पाणीपुरवठा झाला आहे त्या भागातील नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले आहे.

महानगर पालिकेच्या नूतन वसाहत भागात असलेल्या पाणी पुरवठा करणाऱ्या जलकुंभात अनिल पंडीत काकडे (वय ३२ रा. नूतन वसाहत) या तरुणाचा मृतदेह आढळून आला. ही घटना रविवार (दि १३) रोजी उघडकीस आली. हे वृत्त शहरभरात पोहचले. त्यावेळी एकच खळबळ उडाली.

नूतन वसाहत भागात काल पाणीपुरवठा करण्यात आला होता मात्र, हे पाणी दूषित आले होते. त्यामुळे नागरिकांनी जलकुंभावर चढून पाहणी केली असता जलकुंभात सडलेल्या व्यक्तीचा मृतदेह असल्याची बाब समोर आली. या घटनेची माहिती मिळताच जालना शहर महानगर पालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. नागरिकांना शांततेचे आवाहन करण्याबरोबरच या जलकुंभातील सर्व पाणी सोडून देण्यात आले तसेच नागरिकांनी हे पाणी न पिण्याचे देखील आवाहन श्री खांडेकर यांनी यावेळी केले. ज्या-ज्या भागात येथून पाणीपुरवठा झालेला आहे अशा भागातील नागरिकांची आरोग्य तपासणी ही आशा वर्कस्च्या मदतीने लवकरच करणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.



अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी येत मदतकार्य केले. जलकुंभातील मृतदेह बाहेर काढण्यात आला असून उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या घटनेचा तपास कदिम जालना पोलीस ठाण्याचे अधिकारी करत आहेत.

दरम्यान घटनेची माहिती मिळताच शहरभरातून नागरिकांनी जलकुंभावर गर्दी केली होती. आ. कैलास गोरंट्याल, माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, शिवसेना उद्धव ठाकरे जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने, उपनिरीक्षक नागरे आदींनी घटनास्थळी भेट दिली.

## संपादकीय

# ई कचऱ्याविषयी जागरूकता हवी.

आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि ई कचऱ्याचा पुनर्वापर या बाबत जनजागृती करणे हा या दिवसा मागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५0 हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्या विषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्या प्रमाणेच करतो. घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ, टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते. यासोबतच महिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, माती आणि पाण्यात मिसळले की सभोतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनार्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १00 दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅक्चरिंग महत्वाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# नवरात्रीत देवींचे, आराधना अत्यंत महत्त्वाचे आहे - शकुंतला दीदी

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील ईश्वरीय विश्वविद्यालय शाखेतर्फे शकुंतला दीदी यांनी नुकतेच नवरात्रीमध्ये देवींच्या उत्सवाचे महत्व भाविक भक्तांना समजावून सांगितले ते पुढील प्रमाणे. ईश्वरीय विश्वविद्यालय शाखा टेंभुर्णी मध्ये अनेक भाविकांची उपस्थिती होती. भारतात नवरात्री महोत्सव मोठ्या उत्साहाने व भक्तीभावाने साजरा केला जातो. बहुतेक ठिकाणी नवरात्राच्या प्रारंभी घटस्थापना करतात व त्यापुढे नऊ दिवस व नऊ रात्री अखंड दिप तेवत ठेवतात. या नऊ दिवसात कुमारीचे पूजन व्रत उपवास जागरण ई-करतात नवरात्रात रात्रभर देवीच्या पुढे गरभा खेळण्यात मोठ्या संख्येने युवक युवती आनंद मानतात. वास्तविक अशा प्रकारे जागरण केल्यामुळे अल्पकाळचा आनंद प्राप्त होईल परंतू जेव्हा या सृष्टीवर अधर्म व अत्याचार वाढतो तेव्हा निराकार शिव परमात्मा शक्तीची रचना करतो. आपण भारतवासी दिव्य अवतरणाचे प्रतीक म्हणून शिवरात्री साजरी करतो तसेच शक्तीच्या महान कार्याचे प्रतिक म्हणून नवरात्री साजरी करतो. अशा प्रकारे या दोन्ही शब्दातील रात्री या शब्दाचा अर्थ आहे कलियुगातील अज्ञान अंधकार अथवा तमोगुणाची वृध्दी. अशा या कलियुगाच्या अज्ञात रात्री परमात्मा शिव पिता आत्मा रुपी आपल्या मुलांना अज्ञान निद्रेतून जागवतो व सतयुगी नवप्रभात लवकरच होणार असल्याची सुवार्ता देतो . या राजयोगाच्या अभ्यासाने मानव पुन्हा देवी-देवता तुल्य बनतो याचेच आज सुध्दा हिंदू धर्मात नऊ दिवस देवीची पूजा करतात म्हणून नवरात्र म्हणतात. आता आपण **नऊ देवीचे अध्यात्मिक रहस्य जाणून घेऊया.**

दुर्गा : नवरात्रीतील पहिला दिवस हा दुर्गा देवीच्या रुपात मानला जातो.

तीची शैलपुत्री या नावाने पुजा केली जाते, दुर्गा देवीला शिवशक्ती सुध्दा म्हटले जाते. शिवपित्याकडून या दुर्गादेवीने सद्गुण अंगीकार करुन भक्तांतील दुर्गुण जसे काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार, द्वेष, इर्षा, बदल्याची भावना इत्यादी अवगुण त्या ऐवजी प्रेम, सुख, शांती, पवित्रता, इत्यादी सद्गुण दिले म्हणून ती दुर्गा नावाने प्रसिध्द झाली.

अष्ट भूजा : या अष्टभूजा देवीने शिव परमात्म्याकडून अष्ट शक्तिची प्राप्ती केली जसे सहनशक्ती, सामावन्याची शक्ती, परखण्याची शक्ती, निर्णय शक्ती, निर्भय शक्ती, सहयोग शक्ती, समेटण्याची शक्ती, सामना करण्याची शक्ती, या शक्तींना तिने धारण करुनं आपले जीवन श्रृंगारीत केले होते. तो श्रृंगार सर्व अष्ट शस्त्रांनी दर्शविण्यात आला आहे. त्याचे आध्यात्मिक रहस्य खालील प्रमाणे.

चक्र : विपरीत परिस्थितीमध्ये आणि आसूरी संस्काराच्या लोकामध्ये राहून मनाला एकाग्र करणे आणि वाईट अवगुणांना समाप्त करण्याचे प्रतीक आहे.

तलवार : तिक्षण बुध्दी, ध्यान चिंतन द्वारा आसूरी प्रवृत्तीचा संहार करण्याचे प्रतीक.

गदा : पाच विकारांवर विजय प्राप्त करण्याचे प्रतीक.

वरदहस्त : आशिर्वाद सदा देण्याची भावना.

त्रिशुल : सद्गुणाद्वारे दुर्गुणाचा संहार करण्याची निशाणी व तीन्ही प्रकारचे संकट टाळण्याचे प्रतिक ६) शंख: मधुर वाणी ची निशाणी अर्थात ज्ञान ध्वनीचे प्रतीक

धनुष्यबाण: आपल्या लक्ष्यापर्यंत पोहचण्याचे प्रतीक

कमळ : न्यारापण अर्थात संसारामध्ये राहुन बुध्दिने अलिम राहणे अर्थात पवितेचे प्रतीक आहे.

माळा: परमपिता परमात्म्याचे स्मृतिची निशाणी आहे.

तिच्या अह भूज्या या परमात्मा शिव पित्याकडून प्राप्त अष्ट शक्तिचे प्रतीक आहे. तसेच तीने निर्भय बनून दुर्गुणांना समाप्त करून प्रकृतीला निकले म्हणून ती बाधावर बसलेली दाखवितात. एनजडीत मुकुट ज्ञान धनाने भरपूर होण्याची निशाणी, लाईटचा मुकुट पवित्रतेची निशाणी आहे.

सरस्वती देवी : ब्रह्मचारीणी आहे. भक्तजन सरस्वतीला माँ अंबे

शब्दांनी बोलवतात. जगदंबा सरस्वती आणि श्री लक्ष्मी ह्या शक्तीवा आध्यात्मिक शक्तींनी भरपूर होती ईश्वरीय ज्ञानाद्वरे पाच विकारावर विजय प्राप्त केले त्याचे फळ सरस्वतीने भविष्यात विश्व महारानी श्री लक्ष्मी पद प्राप्त केले. म्हणून शास्त्रात गायन आहे. नर ऐसी कर्णी करे जो नारायण बने, नारी ऐसी कर्णी करे जो लक्ष्मी बने अर्थात श्रेष्ट कर्म केल्याने आपल्याला सुध्दा ज्ञानाची शक्ती प्राप्त केल्याने अखुट धनधान्य, सुख संपत्ती, शांती प्राप्त होईल. दुसऱ्या मणुष्याला पाहिजे विद्या, धन, युक्ती, प्रसिध्द आहे की ज्ञाना बिना मणूष्याची सद्गती नाही. ज्ञानाला रत्न किंवा धन म्हटले जाते. ज्ञानाच्या प्रामीसाठी भक्त सरस्वतीचे गायन वंदन करतात. शाळेमध्ये सुध्दा सरस्वतीला विद्या देवी माणून तीचे पूजन करतात. आणि बुध्दीचे वरदान मागतात. म्हणून सरस्वतीचे बाहन मोर किवा हंस दाखवितात. सरस्वती पूजनीय आहे. कारण परमात्म्याने जे ज्ञान दिले

त्यांची आठवण करून ते जीवनात धारण करणे व दुसऱ्यांना भरपूर ज्ञान देणे त्याचे गावन विद्यादेवी सरस्वतीच्या रुपाने होत गेले व त्यांनीच नर नारींना ज्ञान रुपी विना वादन करुन पवित्र बनविले.

संतोषी देवी ; संतोषी देवीने सदैव आपल्या जिवनामध्ये संतुष्ट राहुन असंतुष्टता वा अवगुणाला दूर करणारी आहे. कोणाचेही मन दुःखी न करण्याचे प्रेरणा देणारी अर्थात भक्तांणा संतुष्टतेचा गुण देणारी असल्यामूळे ही देवी मंतोषी नावाने प्रसिध्द झाली.

महाकाली देवी : कुंठपाडा या नावाने पुजा केली जाते असे म्हणतात की ही देवी रक्त पिणारी देवी आहे. या कलीयुगात ह्या देवीला पूजे मध्ये पशुबळी देण्याची प्रथा आहे. याचा अर्थ आपल्यातील विकारी स्वभाव संस्कारावर विक्राल रुप धारण करुन अर्थात दृढ प्रतिज्ञा करुन त्याला समाप्त करणे.

गायत्री देवी : स्कंद माता म्हणून माणली जाते ज्ञान देणारी देवी आहे आणि गायत्रीच्या रुपाने पवित्रता प्रदान करणारी देवी आहे. ह्या देवीची पूजा केल्याने मणूष्य ज्ञानी बनतात.

वैष्णौ देवी : कान्याणीच्या रुपाने पूजा केली जाते. या देवीने कान्यायन यांच्या कडे मुलीच्या रुपाने अवतार घेतला. ह्या देवीची पूजा केल्याने आपल्या मनातील प्रत्येक इच्छा पूर्ण होतात. अवघड काम सुध्दा सहज होते. भक्तांचे सर्व कार्य सहज करणारी देवी आहे. मायेच्या

विषयी विकारा पासून स्वतः दूर राहणे व दुसऱ्याला त्यापासून मुक्त करणे.

उमा देवी : ७ व्या दिवशी देवी काळरात्री आहे. तीचा रंग काळा व गाढवावर सवारी दाखविली जाते आसूरा करीता काळाचे रुप प्रकट केल्याने तीची पूजा काळरात्री म्हणून केली जाते म्हणजेच दुःखदायी परीस्थितीत सुध्दा सदा उमंग उत्साहा मध्ये राहणे व सर्वांना सतत उमंग उत्साह देणे, ९) महालक्ष्मी देवी : नवव्या दिवशी देवी सिध्ददायी आहे. ही देवी श्री लक्ष्मी वा श्री नारायण यांचे एकत्रित स्वरुप आहे. म्हणून महालक्ष्मीला चार हा दार्खा तात. श्री लक्ष्मीच्या रुपाने सर्वांना गुणांचे दान करणारी व भक्तांचे दुःख, कष्ट दुर करणारी मुक्ती देणारी हे रत्नजडीत मुकुट आहे या बरोबरच स्व रीवर्तना द्वारे विश्व परिवर्तन करणे पवित्रता धारण करणे हे लाईटचा ताज याचे प्रतीक आहे. आपले जीवन कमलाच्या फुला प्रमाणे न्यारे व प्यारे बनविणे स्वतः (आत्मा) चे दर्शन करणे अर्थात स्वतः मध्ये कमजोरी बघून त्या काढून मुखाद्वारे ज्ञान सांगणे ही सर्व कमळ स्वदर्शन चक्र, शंख यांचे आध्यात्मिक रहस्य आहे. व धन प्राप्त करण्यासाठी लक्ष्मीचे पूजन करतात. दर वर्षी दिवाळी आल्यावर मुख्य रुपात घरादाराची खूप रंगरंगोटी करुन स्वच्छता करतात. दुसरे लाईटींगने सजवितात, दिपक लावतात, ज्योती लावतात, आणि श्री लक्ष्मीचे आव्हान करतात की, घर गृहात प्रवेश हो. तीसरे आपले जूने वही खाते बंद करुन नविन सुरु करतात. चवथे दिवाळीच्या दिवशी दिप दान करतात. पाचवा महारात्री म्हणून जागरण करतात. अशा प्रकारे पाच प्रकारचा पुरुषार्थ

परमात्म्याच्या आठवणीद्वारे मनाची सफाई ज्ञानामृत द्वारा बुध्दीची शुध्दी आणि स्वतःला आत्मा समजून दृष्टी वा वृत्तींची पवित्रता.

मनरुपी घरामध्ये आत्मारुपी दिपकाची विझलेली बत्ती ला सदा जागती ज्योत परमात्मा शिवाच्या सोबत लावून पुन्हा प्रकाशीत करणे. प्रत्येक मानव आत्म्याची ज्योत जगणे म्हणजेच दिपमाला आहे. तेव्हा श्री लक्ष्मी ह्या पृथ्वीवर येऊ शकते. आपले जुने वही खाते साफ करण्यासाठी परमात्म्याची स्मृतीची ज्वाला जाळणे आणि रोज आपल्या कर्माची चांगले किंवा वाईट फायदा नुकसान बघण्यासाठी डायरी ठेवणे.

ज्ञानयोग रुपी दिपक दान करणे.

परमात्म्याचे मामेकम शरण वज्र या मंत्राला सिध्द करणे या पाच प्रकारे पूरुषार्थ केल्याने निश्चितच श्री लक्ष्मी घरावर अवश्य येईल.

ब्रह्माकुमारी : ब्रह्माजीने आपल्या संकल्पाद्वारे मनुष्यात्म्यांना जागृत

केले आणि त्यांची पूर्व स्थिती आदि दैविशक्ती निर्माण केली आणि भारताला अज्ञान अंधकारात झोपलेल्या मनुष्यात्म्यांना ज्ञानामृत देऊन जागविले म्हणून त्या भारतात ज्ञानगंगाच्या रुपात प्रसिध्द झाली त्यांच्या हातात ज्ञानाचा कलश दाखविण्यात येतो. आज ह्याच ब्रह्माकुमारी भगीनी संपूर्ण विश्वात ज्ञानगंगा बनून मनुष्यात्म्यांना ज्ञानामृत देण्याचे कार्य करीत आहेत.

अशा प्रकारे नऊ देवीच्या अध्यात्मिक रहस्यांना जाणून हे लक्षात आले असेल की, नवरात्र महोत्सवाचा काळ हा वर्तमान पूरुषोत्तम संगमयुगा मध्ये परमात्मा शिव पित्याकडून ईश्वरीय ज्ञान सर्व गुण वा सर्व शक्तीची प्राप्ती होते. तसेच राजयोगाच्या अभ्यासाने मणुष्य आत्मा शिव शक्ती स्वरुप बनतो. ज्याचे गायण पूजन भक्ती मार्गात होत आहे. अशा प्रकारे नवरात्रातील नऊ दुर्गापूजा ही शिवशक्तीच्या महान कार्याची पाच प्रतीक आहे. जेव्हा अशी नवरात्री साजरी करु तेव्हा आपल्यातील विकार (काम,

लोभ, मोह, अहंकार) हे नष्ट होतील, खऱ्या अर्थात दसरा (विजयादशमी) साजरा होईल, असा दसरा साजरा केल्या नंतरच भविष्यात येणारी विवाळी अर्थात सतयुगी दुनियेतील सुखाचा अनुभव करु, तरी हे आत्म्यांनो जागा, फक्त नवरात्रीमध्येच जागरण करु नका, तर अज्ञान निद्रेतून जागे व्हा वर्तमान काळात स्वयं परमात्मा शिव पिता या सृष्टीवर अवतरीत होऊन मणूष्यात्म्यांना पुन्हा शिवशक्ती बनविण्याचे महान तम कार्य करीत आहे. त्यामूळे या महान काळाला ओळखा व मी कोण आहे ? परमात्मा कोण आहे ? कोठे जायचे आहे ? आता काळ कोठला चालु आहे ? हे सर्व जाणुन घेण्यासाठी परमात्मा शिव पित्याने स्थापन केलेल्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या जवळील शाखेस भेट देऊन परमात्म्याने केलेले आव्हान स्विकारावे आणि आपले जिवन देवी देवता प्रमाणे श्रेष्ठ बनविणे आसूरी संस्कार नष्ट करणे हीच खऱ्या अर्थाने नवरात्री साजरी करणे होय. आता या नवरात्रीमध्ये काही नवीन करा व जीवनात परिवर्तन आणा. वाईट अवगुण अज्ञान रुपी रात्रीला कायमचे नष्ट करा. अशी नवरात्री निमीत्त तुम्हा सर्वांना शुभकामना !

**थोडक्यात असे म्हणता येईल**

नवरात्र महोत्सव हा बघ आला, शिवशक्ती तूची ओळख स्वतः ला या व्याख्यानाच्या आयोजन बोरुडे गुरुजी, शिवा मामा जाधव, शेषराव मुळे, मुळे तलाठी, जमधडे, तसेच ओम शांती मध्ये येणाऱ्या, इंगळे ताई, सर्व दीदींनी केले होते.

# टेंभुर्णीच्या ग्रामदैवत रेणुका माता मंदिर येथे रांगोळीच्या मूर्ती चित्रकार यांना बक्षीस

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील ग्रामदैवत रेणुका माता संस्थानच्या वतीने नवरात्र उत्सव साजरा करण्यात आला या नवरात्र उत्सवामध्ये नऊ दिवस वेगवेगळ्या काढण्यात आल्या रांगोळी चित्रकारांना बक्षीस वाटण्यात आले . बक्षीस पात्र चित्रकार मुली यामध्ये धनश्री धनवाई, शिवानी डोमाळे, पुनम सपकाळ, आसावरी सपकाळ, मनीषा धनवाई, श्रेया वाघ, यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थांचे अध्यक्ष हौसेराव देशमुख, उपाध्यक्ष गंगाराम धनवाई, उपाध्यक्ष रामराव जमदाडे, संस्थांचे सचिव प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, संस्थांच्या विश्वस्त सरस्वतीबाई देशमुख, कमलाबाई देशमुख, सखुबाई कांबळे,आशा गुरव, विश्वनाथ सांगोळे सुरेश शिराळे, सुनील देशमुख, आबाराव देशमुख, लक्ष्मण शिंदे, कैलास भागवत, शरद देशमुख दीपक देशमुख, गजानन दहिवाळ, गणेश जाधव बंडू जाधव, भागवत, चंद्रकांत कांबळे, तसेच असंख्य महिला भक्त मंडळ यावेळी उपस्थित होते.



देशमुख, किसन जोशी रमेश जाधव, लक्ष्मण खताळ सचिन जाधव, अविनाश देशमाने,मनोहर घोडके, हा थमाजी शैलेश डोमाळे ज्ञानेश्वर तिडके, नारायण उकर्डे किशोर कांबळे, गणेश मदने, पुरुषोत्तम साळवे, गणेश संस्थांचे वतीने दिगंबरराव शेडुते यांचे अभिनंदन केले. व संस्थांच्या वतीने त्यांच्या आभार मानले.

# विकासाच्यादृष्टिने निर्णय घेत काम केले - पालकमंत्री सावे



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याच्या मागील दोन वर्षात विकासाच्या दृष्टीने अनेक महत्वाचे निर्णय घेवून नेहमीच चांगले काम करण्याचा प्रयत्न केला असल्याचे प्रतिपादन राज्याचे गृहनिर्माण, इतर मागास बहूजन कल्याण मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

राज्याचे गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते आज जिल्हा क्रिडा संकुल टप्पा २ आणि जिल्हा नियोजन समिती सभागृहाच्या लोकार्पण सोहळाप्रसंगी श्री. सावे बोलत होते. यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार राजेश राठोड, आमदार कैलास गोरंट्याल, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, पंडित भुतेकर,औदूंबर बागडे, भाऊसाहेब घुगे, अण्णासाहेब चित्तेकर, रविंद्र तौर, मिर्झा अन्वर बेग, भाऊसाहेब गौरे, बाबासाहेब इंगळे, योगेश रत्नपारखे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# रोटरी इलाईटच्या व्यंकटेश नगर नवरात्र शिबिरात ७५ जणांची मधुमेह तपासणी; २३ जणांचे रक्तदान

**जालना । प्रतिनिधी -** व्यंकटेश नगर नवरात्र महोत्सव समिती व रोटरी क्लब जालना इलाईट यांच्या संयुक्त संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत मधुमेह निदान शिबिरात ७५ जणांची तपासणी करण्यात आली. यावेळी २३ जणांनी स्वयंस्फुर्तीने रक्तदान केले. या शिबिरात रोटरी इंटरनॅशनलचे डिस्ट्रिक्ट डायरेक्टर डॉ. राजेश सेठीया यांनी मधुमेह तपासणी केली. तपासणी केलेल्या ७५ जणांत १६ मधुमेह तर तेवढेच प्रिडायबीटिज आढळले. रक्तदान शिबिरात २३ जणांनी रक्तदान केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी व्यंकटेशनगर नवरात्र महोत्सव व इलाईटचे अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, महोत्सवचे उपाध्यक्ष गणेश बाले, उपाध्यक्ष प्रितीपालसिंग टुटेजा, कोषाध्यक्ष भागवत डोंगरे, योगेश सोनी, दुर्गेश मोहिते, सचिव श्री. औसेकर, सहसचिव संतोष पंचारिया, तुकाराम डोंगरे, प्रसिद्धी प्रमुख रावसाहेब कांगणे, डोंगरसिंग, संतोष तमशेटे, गजानन गवळी, रामेश्वर तळेकर, अशोक जोगड, कुलदीप मोहिते, अक्षय महाराज, राजीव गवळी, राजू थाडा, सुनिता थाडा, महावीर लोढा, धिरज चांडक, पांडुरंग वाघमारे, श्री. पडुळ, गंगासागर डोंगरे, सुदर्शन डोंगरे, गिरीश बाफना, इलाईटचे संचालक विजयालक्ष्मी बाले, डॉ. प्रल्हाद उढाण, गिरधर लधानी व महोत्सवच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.



# नवरात्रोत्सवात सर्वत्र मधुमेह निदानाचा जागर; २० हजारावर तपासणी-डॉ. सेठीया

## ११ जिल्ह्यात राबविले जातेय 'अब की बार, एक लाख पार' विशेष अभियान

**जालना । प्रतिनिधी -** मधुमेहाचे तात्काळ निदान व्हावे आणि गुंतागुंत निर्माण होण्यापूर्वीच उपचार सुरू करता यावेत, यादृष्टीने रोटरीचे प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्या संकल्पनेतून आणि रोटरी इंटरनॅशनलचे डायबिटीज डायरेक्टर डॉ. राजेश सेठीया यांच्या माध्यमातून मधुमेह निदानासाठी रोटरी प्रांताच्या ११ जिल्ह्यात ' 'अब की बार, एक लाख पार' हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत नवरात्रोत्सवात ठिकठिकाणी आयोजित शिवरायांच्या माध्यमातून प्रांतात २० हजारावर तर जालना जिल्ह्यात तीन हजारावर तपासणी करण्यात आली.

यासंदर्भात अधिक माहिती देताना डॉ. सेठीया म्हणाले की, वर्षभरात एक लाख मधुमेह निदान तपासणी करण्याचे ध्येय रोटरीने ठेवले आहे. त्यासाठी शिबिरे घेतली जात आहेत. अंबड येथील मत्सोदरीदेवी नवरात्रोत्सवात ९ दिवस मधुमेह निदान शिबिर घेण्यात आले. त्यात ५०० जणांनी सहभाग नोंदविला. रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनच्या रूबरू दांडियात ६६, बी. आर. जिंदल मार्केटमध्ये दुकानदार, ग्राहक आणि कर्मचाऱ्यांसाठी आयोजित शिबिरात १४३, रोटरी रेनबोतर्फे दुर्गामाता नवरात्रोत्सवात दोन दिवस घेण्यात आलेल्या शिबिरात ६००, गणपती गल्लीतील महालक्ष्मी मंदिरातील शिबिरात ७६, बडी सडकवरील रुबी हॉस्पिटलमध्ये दररोज ५० याप्रमाणे ९ दिवसात ४५०, रोटरी क्लब जालना आयोजित शिक्षकांसाठीच्या कार्यशाळेत २४०, रोटरी इलाईटच्या शिबिरात ७५, जालना जनसेवा ग्रुपच्या कार्यक्रमप्रसंगी १०६ याप्रमाणे नवरात्रोत्सवात अडीच हजार पेक्षा जास्त मधुमेह निदान तपासणी करण्यात आली, अशी माहिती डॉ. सेठीया यांनी दिली. रोटरी-३१३२ या प्रांतात ११ जिल्हे आहेत. त्या जिल्ह्यातही रोटरीतर्फे नवरात्रोत्सवात मधुमेह निदान हे विशेष अभियान राबविण्यात आले. बीड, जालना, अंबड, सोलापूर, अहमदनगर, नांदेड, सातारा जिल्ह्यातील मोडनिंब, सांगोला, उमरज आदी ठिकाणी उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून, नवरात्रोत्सवाच्या ९ दिवसात प्रांतात वीस हजारापेक्षा जास्त मधुमेह तपासणी करण्यात आली, असे डॉ. सेठीया म्हणाले.

**मधुमेहाचे वेळीच निदान झाल्यास भविष्यातील गुंतागुंत टाळता येते**

मधुमेह आजार जडल्यास तो शेवटपर्यंत पिच्छा सोडत नाही. तो नियंत्रित ठेवणे एवढेच आपल्या हातात असते. अनेकांना तर मधुमेह असल्याचेच माहित नसते. कारण बराच काळ त्याची लक्षणेही जाणवत नाहीत. प्रारंभिक स्तरावर निदान झाल्यास भविष्यातील गुंतागुंत टाळता येते. प्री- डायबेटिक असलेल्यांना वेळीच उपचारानंतर मधुमेह रुग्ण होण्यापासून वाचविता येऊ शकते. त्यासाठीच निदान होणे महत्त्वाचे आहे. त्या अनुषंगाने रोटरीने मधुमेह निदान शिबिराच्या माध्यमातून 'अब की बार, एक लाख पार' हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे, वर्षभरात एक लाख तपासणीचे ध्येय आहे. याशिवाय गर्दीची ठिकाणे जसे रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड, विविध कार्यक्रमस्थळी शिबिरे घेतली जात आहेत. सुरुवातीपासूनच प्रतिसाद मिळत आहे. आता मोठ्या प्रमाणात जनजागृती झाल्याने अनेक नागरिक स्वतःहून रुबी हॉस्पिटलमध्ये येऊन दिवसभर सुरू असलेल्या मोफत मधुमेह निदान सेवेचा लाभ घेत आहेत. शिबिरातही स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन तपासणी करून घेत आहेत. फक्त एका मिनिटात मधुमेह निदान होते. जास्त वेळ लागत नाही. वाढता प्रतिसाद पाहता, एका वर्षाच्या आत म्हणजेच ८-९ महिन्यातच एक लाख तपासणीचे उद्दिष्ट पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करून, उद्दिष्ट पूर्तीनंतरही वर्षभर हे अभियान सुरूच राहणार असल्याचे डॉ. सेठीया यांनी सांगितले.




# रेल्वे डब्यात साई मंडळाच्या भजनाने दुमदुमली डोंबिवली नगरी



**डोंबिवली । प्रतिनिधी -** विजयदशमीच्या निमित्ताने दरवर्षी आपापल्या रेल्वेच्या डब्यात विजयदशमी हा सण जोरदार पद्धतीने साजरा केला जातो. यंदाही साई भजन मंडळ ( डोंबिवली - दिवा ) यांनी अति उत्साहीत आणि जल्लोषात साजरा केला. यावेळी वारकरी परंपरा जपत या मंडळाचे अध्यक्ष अंकुश बोरगे यांनी एक देश, एक गणवेश असे दाखवून दिले. प्रदीप कदम यांनी आपल्या मध्य, पश्चिम, हार्बर या तिन्ही मार्गाचे सर्व भजन मंडळ कमिटीचे अध्यक्ष हनुमंत तावडे महाराज यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी दिनेश हुमणे यांचाही सत्कार करण्यात आला. भजन मंडळाचे उपाध्यक्ष प्रदीप कदम यांनी भजनाच्या तालावर सर्वांना मंत्रमुग्ध करून भजन परिसर दुमदुमून टाकले. प्रत्येकाचे पाय या गाडीकडे आकर्षण करीत होते. गाडी पूर्णपणे हार, फुगे, पताके, लावून पारंपारिक पद्धतीने सजविली जाते. नारळ वाढवून गाडीची आणि देवींची पूजा, आरती केली जाते. हा रोजचा येण्याजाण्याचा प्रवास सुखकर व्हावा असे गाऱ्हाणं घालण्यात सर्व भजन मंडळ, आणि प्रवासी हातभार लावत असतात. यावेळी विकास हळदवणेकर, उमेश घरवे, राकेश गायकवाड, प्रविण मेढेकर, विजय वर्दम, अशोक शिंदे, सचिन बेलकर, विनय विचारे, विजय बेलकर, दिपक कांबळे, प्रशांत नारकर, सुदर्शन सांगले, नितीन देवकर, दिंगबर बच्छाव, रवी फाटे आणि या भजन मंडळात महिलांचा समावेश आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून येत होता. आदी मंडळी उपस्थित होती. आणि अश्याप्रकारे डोंबिवली ते सीएसटी प्रवासाने विजयादशमी साजरी होते.

# व्यंकटेशनगर नवरात्र महोत्सव समितीतर्फे कन्यापूजन कार्यक्रम



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील व्यंकटेशनगर सार्वजनिक नवरात्र महोत्सव समितीच्यावतीने ४० बालिकांचा कन्यापूजन व कन्या भोजन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

भारतीय संस्कृतीच्या रुढी-परंपरा अखंडपणे सुरू राहाव्यात, सर्वांनी कुमारिकांमध्ये नेहमी देवी स्वरुपाचे दर्शन करावे, या उद्देश्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. व्यंकटेशनगर नवरात्र महोत्सव समिती व रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटचे अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल हे या कार्यक्रमाचे यजमान होते. प्रारंभी ४० कन्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर कन्यापुजन व कन्या भोजन कार्यक्रम दांडिया रास व संगीत वाद्याच्या मंगलमय वातावरणात पार पडला. यावेळी शारदा अग्रवाल, सुषमा अग्रवाल, बबली टुटेजा, संजोग टुटेजा, श्रीमती सोनी, श्रीमती रुणवाल, श्रीमती हजारे, विजयालक्ष्मी बाले, ज्योती अग्रवाल, सुनीता थाडा आदींच्या हस्ते कन्यांना भेटवस्तू तर उपस्थित उपस्थितांना प्रसाद वाटप करण्यात आला.

यावेळी अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, उपाध्यक्ष गणेश बाले, प्रितीपालसिंग टुटेजा, कोषाध्यक्ष भागवत डोंगरे, योगेश सोनी, दुर्गेश मोहिते, सचिव गणेश औसेकर, रावसाहेब कांगणे, तुकाराम डोंगरे, श्री. पाबळे, सुभाष देठे, नेताजी साबळे, कुलदीप मोहिते, राजीव गवळी, अक्षय महाराज, श्री. मानवतकर, श्री. सोनी, श्री. डोंगरे व भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# बौद्ध धम्माची शिकवण लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण आयुष्य वेचले - प्रा.अनिल वैद्य

**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद येथे ६८ वा धम्म चक्र प्रवर्तन दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ.आर .टी .देशमुख यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा अनिल वैद्य यांनी आपल्या भाषणातून आपले विचार व्यक्त करताना बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या धम्म चक्र प्रवर्तनांने संपूर्ण बहुजन समाजाला नवा जन्म दिला, दलितांच्या उद्धारासाठी आपलं आयुष्य वेचलं.भगवान बुद्धाची शिकवण लोकांपर्यंत सोप्या शब्दात पोहचण्यासाठी बावीस प्रतिज्ञा देऊन त्यांना आपल्या जिवनांच सोनं करण्याची नवी उमेद निर्माण करून दिली. जाती व्यवस्थेला न मानणाऱ्या आंबेडकरांनी धर्मांतर करून बहुजनांच्या उध्दाराचा नवा मार्ग मोकळा केला. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या हक्कांसाठी , दलितांच्या न्यायासाठी, तथाकथित उच्चवर्णीयाकडून अपमानास्पद मिळणाऱ्या वागनुकीसाठी धर्मांतर केले असे त्यांनी आपल्या भाषणातून आपले विचार व्यक्त केले.प्रा.वैद्य यांनी धम्म चक्र प्रवर्तन दिन म्हणजे काय, अशोका विजयादशमी म्हणजे काय, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा का केली,हा येवढा मोठा निर्णय त्यांना का घ्यावा लागला , बौद्ध धर्मात बौद्ध बांधव अशोका विजयादशमी, दसरा का व कसा साजरा करतात अशा विविध पैलूंवर प्रकाश टाकला.या कार्यक्रमाचे सन्माननीय अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर. टी.देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात तथागत भगवान गौतम बुद्धांनी सांगितलेल्या आपल्या धर्माची शिकवण मानसाला मानुस कशी बनवते, आणि आपला अत्मोध्दार करण्यासाठी कशी उपयोगी ठरु शकते असे मत व्यक्त केले.पुढे ते म्हणाले, १४ऑक्टोबर १९५६ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी इतिहासातील सर्वात मोठे धमांतर घडवून आणले व भारतात बुद्ध विचारांची पुनः स्थापणा केली.हा भाग जरी धर्मांतराचा होता मात्र त्यापेक्षाही मोठं पाऊल होतं ते तत्कालीन सात कोटी अस्पृश्यावर लादलेल्या अस्पृश्यतेच्या निवारणाच, बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येक मार्गाने अस्पृश्यता निवारण करुन पाहिली परंतु प्रत्येक वेळी त्यांना अपयशच आलें.म्हणुनच डॉ बाबासाहेब आंबेडंकरांनी धर्मांतर केले.

या कार्यक्रमास वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रोफेसर डॉ सुनिल मेढे यांची विशेष उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.एम जी मोरे यांनी केले.आभार प्रदर्शन प्रा डॉ जितेंद्र वाघ यांनी केले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सांगता हि राष्ट्रगीताने करण्यात आली.




## विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर बैठक

**जालना -** आगामी विधानसभा निवडणूक-२०२४ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील ९९-परतूर विधानसभा, १००-घनसावंगी विधानसभा, १०१-जालना विधानसभा आणि १०२ बदनापूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांची बैठक जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली.

# विद्यार्थ्यांनी दिली संविधानावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षा

जाफराबाद । प्रतिनिधी - नवरात्रोत्सवाचे नऊ शैक्षणिक उपक्रम सामाजिक परिवर्तनासाठी या नावीन्यपूर्ण व ज्ञानोपयोगी उपक्रमाचे आयोजन जालना येथील १०० शिक्षक समूहातर्फे नवरात्री उत्सवानिमित्त करण्यात आले आहे. आव्या दिवसाचा आठवा उपक्रम म्हणजे भारतीय भारतीय संविधानावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन शुक्रवार (दि.११) रोजी शहरातील विविध शाळात करण्यात आले होते. ही परीक्षा ३७५५ पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी दिली. जालना शहरातील शांतिनिकेतन विद्यामंदिर शाळेचा या परीक्षेत वैशिष्ट्यपूर्ण सहभाग होता शाळेतून ६३० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यावेळी परीक्षा सत्रास उपशिक्षणाधिकारी शाम देशमुख साहेब यांनी भेट देऊन या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्याध्यापक आर.आर.जोशी, शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे, तुकाराम काकडे, विष्णू बिरादार व शिक्षक समुहाचे अध्यक्ष राजेभाऊ मगर यांची उपस्थिती होती. तसेच कुंभार पिंपळगाव येथील सरस्वती भुवन प्रशालेतील ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. याशिवाय जालना शहरा व्यतिरिक्त सातारच्या रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय भुईज ३५० व त्रिमूर्ती हायस्कूल छत्रपती संभाजीनगरच्या शाळेतील २२० विद्यार्थ्यांनी दिली. सहभागी झालेल्या प्रत्येक शाळेतून प्रत्येकी तीन-तीन विद्यार्थी गुणत्तेच्या आधारे निवडले जाणार असून विजेत्या ठरलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक भेट, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती शिक्षक समुहाचे अध्यक्ष राजेभाऊ मगर, कार्याध्यक्ष आर आर जोशी, संयोजक अशोक माधवले, संदीप इंगोले, डीजी राऊतवाड, व विष्णू बिरादार यांनी याप्रसंगी दिली. या स्पर्धेच्या आयोजनासाठी संयोजन समिती, शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

**परीक्षेत सहभागी झालेल्या शाळांची नावे व विद्यार्थी संख्या पुढीलप्रमाणे**

श्री जीवनराव पारे विद्यालय, चंदनझीरा १४०, लोकमान्य प्राथमिक विद्यालय, घायाळनगर १००, महाराष्ट्र हायस्कूल, जालना १००, नुतन विद्यालय, जुना जालना १००, शांतिनिके तन विद्यामंदिर, जालना ६३०, विवेकानंद प्राथ. विद्यालय, परतूर १५०, वि एम.श्री जि.प. केंद्रीय विद्यालय, नेर १००, सतकर विद्यालय, जालना १००, अहिल्यादेवी प्राथमिक विद्यालय, जालना ७० स्व. नंदकिशोर सहानी विद्यालय, जालना १५०, स्वामी श्री चक्र घर महाविद्यालय, हिश्वन २३०, प्रयाग प्राथमिक शाळा, लक्ष्मीकांत नगर १००, रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊ राव पाटील विद्यालय, भुईज, जि. सातारा ३५०, त्रिमूर्ती हायस्कुल बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर २२०, लाल बहादूर शास्त्री विद्यालय, उस्वद ता. मंठा १३०, कै. बाबुराव जाफ्राबादकर विद्यालय, जालना १५०, जि.प. प्रा. शा. भिलपूरी ३०, जिजामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय निमखेडा (खुर्द) ता. जाफ्राबाद जि. जालना २१२, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, लिंबेवडगाव ता. मंठा ६०, जिल्हा परिषद प्रशाला पाटोदा मंठा ३५, एस.बी. हायस्कूल, कुंभार प्रिंपळगाव ता. घनसावंगी ४०० व जि.प. प्रशाला, सेलगांव २०० आदी.

# टेंभुर्णीचे ग्रामदैवत रेणुका माता संस्थानास दिगंबर शेडुते यांच्याकडून लाऊड स्पीकर सेट भेट

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील टेंभुर्णीचे ग्रामदैवत रेणुका माता देवी मंदिरास, टेंभुर्णी येथील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते दिगंबर राव शेडुते यांच्याकडून लोड स्पीकरचा संपूर्ण सेट दान देण्यात आला. नवरात्र उत्सवामध्ये नऊ दिवस प्रत्येक भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केलेले असतानाच सामाजिक कार्यकर्ते दिगंबरराव शेळके यांनी सुद्धा देवी मंदिरास लाऊड स्पीकर स्पीकरचा सेट देण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा संस्थांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी संस्थांच्या वतीने त्यांना आरतीचा मान देऊन त्यांचे सपत्नीक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थांचे अध्यक्ष हौसेराव देशमुख, उपाध्यक्ष गंगाराम धनवाई, उपाध्यक्ष रामराव जमदाडे, संस्थांचे सचिव प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, संस्थांच्या विश्वस्त सरस्वतीबाई देशमुख, कमलाबाई देशमुख, सखुबाई कांबळे,आशा गुरव, विश्वनाथ सांगोळे सुरेश शिराळे, सुनील देशमुख, आबाराव देशमुख, लक्ष्मण शिंदे, कैलास देशमुख, किसन जोशी रमेश जाधव, लक्ष्मण खताळ सचिन जाधव, अविनाश देशमाने,मनोहर घोडके, शरद देशमुख दीपक देशमुख, गजानन दहिवाळ, गणेश जाधव बंडू जाधव, शैलेश डोमाळे ज्ञानेश्वर तिडके, नारायण उकर्डे किशोर कांबळे, गणेश मदने, पुरुषोत्तम साळवे, गणेश भागवत, चंद्रकांत कांबळे, तसेच असंख्य महिला भक्त मंडळ यावेळी उपस्थित होते. संस्थांचे वतीने दिगंबरराव शेडुते यांचे अभिनंदन केले. व संस्थांच्या वतीने त्यांच्या आभार मानले.



## धारदार तलवारी बाळगणारा आरोपी जेरबंद

**जालना -** धारदार तलवारी बाळगणाऱ्या आरोपीस जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केलय. जालना तालुक्यातील गोकुळवाडी येथे ही कारवाई करण्यात आलीय. रमेश पवार वय १९ वर्ष रा. गोकुळवाडी, जालना असं ताब्यात घेतलेल्या तरुणांचं नाव आहे. दिनांक ११ रोजी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यां इसमांबाबत माहिती घेत असतांना गुप्तबातमीदाराने माहिती दिली की, इसम नामे अरविंद रमेश पवार वय १९ वर्ष, रा. गोकुळवाडी जालना हा गोकुळवाडी, जालना येथे हा तलवारी बाळगुन असल्याची माहिती मिळाल्यावरुन त्याचा शोध घेवुन त्यास त्याचे राहते घराजवळुन ताब्यात घेवुन त्याच्या ताब्यातुन रु.४५००/- किंमतीच्या दोन धारदार तलवारी जप्त करण्यात आल्या असुन आरोपी विरुध्द तालुका पोलीस ठाणे, जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

# महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या पाठीशी संपुर्ण ताकद लावा - शेखर घोडके

## राजेंद्र जाधव यांना जालना विधानसभेची उमेदवारी द्या; कार्यकर्त्यांची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या पाठीशी राष्ट्रवादी काँग्रेसची संपूर्ण ताकद लावण्याचे पार्टीचे जालना विधानसभा निरीक्षक शेखर घोडके यांनी येथे म्हटले आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीचे बिगुल आगामी दोन-चार दिवसांमध्ये केव्हाही वाजण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे सर्वच पक्ष तयारीला लागलेले दिसून येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जालना विधानसभा निरीक्षक शेखर घोडके रविवार (दि १३) जालना दौऱ्यावर होते. यावेळी ते बोलत होते.

श्री घोडके यांनी जालना विधानसभा मतदार संघाचा आढावा घेतला. प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष राजेंद्र जाधव यांना जालना विधानसभेची उमेदवार द्यावी अशी मागणी निरीक्षक घोडके यांच्याकडे उपस्थित पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी केली. राजेंद्र जाधव यांना विधानसभेची उमेदवारी मिळाल्यास येथे राष्ट्रवादीच्या उमेदवाराचा विजय निश्चित असल्याचा दावा देखील या पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी केला आहे. याबाबत निरीक्षक घोडके यांनी पक्षश्रेष्ठींकडे जालना विधानसभेतील विषय मांडणार असल्याचे सांगून वरिष्ठ पातळीवरून जो निर्णय होईल तो निर्णय-आदेश सर्वांनी पाळावा तसेच येणाऱ्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या पाठीशी संपूर्ण ताकद लावावी असेही उपस्थिती पदाधिकारी-कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना श्री घोडके म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना युवक शहर जिल्हाध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी जालना विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद वाढत असल्याचे सांगितले तसेच आमदार राजेश टोपे यांच्या मार्गदर्शनाने जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, नंदकिशोर जांगडे यांच्या माध्यमातून जालना शहरात पक्ष संघटन वाढविण्यासाठी पक्षातील प्रत्येक पदाधिकारी- कार्यकर्ते मेहनत घेत आहेत. पदाधिकारी-कार्यकर्त्यांची ही मेहनत नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत सर्वांनी पाहिलीच आहे.

येत्या विधानसभा निवडणुकीतही पक्ष आदेश देईल त्या महाविकास आघाडीच्या घटक पक्षातील उमेदवाराच्या प्रचारासाठी जीवाचे रान करून आम्ही सर्व काम करू असे आश्वासन श्री जाधव यांनी निरीक्षक श्री घोडके यांना दिले. शेवटी किशोर कांबळे यांनी आभार मानले.

यावेळी अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष शेख फारूक, ज्येष्ठ नेते तय्यब देशमुख, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर धानोरे, सामाजिक न्याय विभागाचे शहराध्यक्ष हरीश कांबळे, शहर उपाध्यक्ष जमीर, युवक उपाध्यक्ष गणेश वाघमारे, राम देवकर, रेखाताई तौर, डॉ. सोनवणे, गोकुळ स्वामी, किशोर कांबळे आदींची उपस्थिती होती.

# जालना शहरात मोतीबाग परिसरात विपश्यना केंद्र मंजूर करून घेणार

### अर्जुनराव खोतकर यांचे आश्वासन



**जालना । प्रतिनिधी -** शहरात महानगरपालिका हद्दीमध्ये संभाजी उद्यान परिसरामध्ये विपश्यना केंद्र उभारणीसाठी आपण जालना शहर महापालिका मार्फत सामाजिक न्याय विभागाकडे १२७ कोटी रुपयांचा परिपूर्ण प्रस्ताव सादर केलेला आहे .लवकरच हा प्रस्ताव आपण मुख्यमंत्री मा एकनाथराव शिंदे साहेब यांच्या माध्यमातून मंजुर करून घेणार असे शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित शिवसेना दलित आघाडी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले . जालना विधानसभा मतदारसंघातील शिवसेना दलित आघाडी कार्यकर्ता भाग्यनगर येथील संपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख उपस्थित म्हणून रिपाई चे मराठवाडा अध्यक्ष एडवोकेट ब्रह्मानंद चव्हाण ,आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ नेते सुधाकर रत्नपारखे , शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख एडवोकेट भास्कर मगरे ,सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी मोहन तायडे, नगरसेवक राहुल हिवराळे, निखिल पगारे, मार्केटिंग फेडरेशनचे माजी चेअरमन महेंद्र रत्नपारखे, सुनील कांबळे, सुनील रत्नपारखे, राहुल आदमने, एडवोकेट बबनराव मगरे ,संदीप साबळे ,बाबासाहेब आंबडकर ,आदी मान्यवर होते .पुढे बोलताना अर्जुनराव खोतकर म्हणाले की मी कधीही जातीभेद केलेला नाही मला सर्व धर्मीय समाजामध्ये कार्य करण्याची आवड असून मी सर्व धर्मीय समाजाच्या सुखदुःखात व धार्मिक कार्यामध्ये सक्रिय असतो. दलित बांधवांसाठी मी अनेक विकासाच्या योजना राबविल्या आहेत. यामध्ये ग्रामीण भागामध्ये दलित वस्त्यांमध्ये सिमेंट रस्ते ,पाणीपुरवठा योजना, सामाजिक सभागृह, भूमिगत नाल्या यांसारख्ये कामं मोठ्या प्रमाणावर केली व शहरांमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर दलितवस्ती मध्ये विकास घडवून आणलेला आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.